Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education,
Kolhapur Divisional Board,
539, Rajendranagar,
Kolhapur - 416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
539, राजेंद्रनगर,
कोल्हापूर - 416004

क्र. कोविमं/लेखा/सन 2026-27 शिक्षण संक्रमण / 2312

दिनांक : 30 / 06 / 2026

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय : माहे जुलै 2026 पासून शिक्षण संक्रमण अंक विनामूल्य उपलब्ध करून देणेबाबत.**

**संदर्भ : राज्य मंडळाचे क्र. रा.मं./संशोधन/शिक्षण संक्रमण/2606, दि.18.06.2026 चे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दर महा शिक्षण संक्रमण अंक छापील स्वरूपात सर्व मान्यताप्राप्त शाळा व सर्व कनिष्ठ महाविद्यालये यांना देण्यात येत होता. तथापि जुलै 2026 पासून शिक्षण संक्रमण अंक Digital स्वरूपात सर्व मान्यताप्राप्त शाळा व सर्व कनिष्ठ महाविद्यालये यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तरी जुलै 2026 पासून शिक्षण संक्रमण अंकाबाबतचे शुल्क भरण्यात येऊ नये. माहे जुलै 2026 पासून शिक्षण संक्रमण अंक सर्व मान्यताप्राप्त शाळा व सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या लॉग-इन (Log in) वर व राज्यमंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे याची सर्व मुख्याध्यापक / प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

**(ए. एस. म्हेत्रे)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

प्रत : मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे

D/Ansar/Registration fees/Letter